कला अकादमी गोवा
कांपाल-पणजी
कअ/काविवि/भ.स्प/२०२६-२७/६३९
दि. १८ /०६/२०२६

# कृपया प्रसिध्दीसाठी

गोवा कला अकादमी आयोजित पं. मनोहरबुवा शिरगांवकर स्मृती पुरुष , महिला व बाल कलाकार भजनस्पर्धा जाहीर करण्यात आली असून सदर स्पर्धेच्या प्रवेशिका नियम व अटींसहित कांपाल-पणजी येथील कला अकादमीच्या कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवरही उपलब्ध करण्यात आल्या आहेत. इच्छुकांनी आपले पूर्ण भरलेले अर्ज दि. २५ जून २०२६ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

यंदा स्पर्धेची सुरुवात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात दरवर्षीप्रमाणे महिला कलाकारांच्या विभागीय भजन स्पर्धेपासून होणार आहे. तरी भजन स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या भजन पथकांनी पुर्णरीत्या भरलेल्या आपल्या प्रवेशिका निर्धारीत वेळेत कला अकादमीच्या कार्यालयात दाखल कराव्यात, त्यानंतर आलेल्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही असे अकादमीने कळविले आहे.

## भजन स्पर्धेचे सत्र आयोजित करण्यासाठी अर्ज पाठवावेत

भजन स्पर्धेचे एखादे सत्र आपल्या गावात आयोजित करण्यास इच्छुक असलेल्या स्वयंसेवी संस्था, सांस्कृतिक मंडळे अथवा देवस्थान समित्यांनी आपले लेखी अर्ज सदस्य सचिव, कला अकादमी गोवा, कांपाल-पणजी ४०३००१ या पत्त्यावर आपला संपूर्ण पत्ता व संपर्कासाठी भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करून दि. २५ जून २०२६ पर्यंत पाठवावेत.

स्पर्धेच्या स्थानिक आयोजनाची जबाबदारी सदर संस्थांनी घ्यावी तर उर्वरित सर्व व्यवस्था (उदा. पथकांची निवड, परिक्षक, ध्वनियंत्रणा व प्रकाशयोजना) कला अकादमीतर्फे करण्यात येईल. ज्या मंदिर किंवा सभागृहांसाठी प्रसाधनगृहाबरोबरच पुरेशी गाड्या पार्किंगची व्यवस्था असेल अशा मध्यवर्ती ठिकाणांचाच प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल. भजनस्पर्धेचा केंद्रवार कार्यक्रम ठरविताना आयोजनातील सुलभताही लक्षात घेऊन कला अकादमीतर्फे अशा अर्जांचा विचार करण्यात येईल याची संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. वए्र.सीुण्‌ ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)